# बृहन्मुंबई महानगरपालिका

अनुज्ञापन खाते

## परिपत्रक

क्र.अअ/2563 , दि. 17.05.2024

विषय– अनुज्ञापन खात्यातील अनुज्ञापन निरीक्षक संवर्गातील रिक्त पदे लिपिक तत्सम संवर्गातील तसेच कनिष्ठ लेखा परिक्षक व लेखा सहाय्यक कर्मचा-यांमधून खात्यांतर्गत निवड पध्दतीने भरण्यासाठी घेण्यात येणा-या ऑनलाईन परिक्षेच्या अनुषंगाने विविध संघटनांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण वर्गास उपस्थित राहण्याकरीता संबंधित कर्मचाऱ्यांना दिड तास कार्यालयातून लवकर जाण्याची सवलत देण्याबाबत.

संदर्भ – अति.आयुक्त (शहर) यांची मंजूरी क्र.अति.आ./शहर/डी/388 , दि.17.05.2024

बृहन्मुंबई महानगरपालिका अनुज्ञापन खात्याच्या वतीने मे. आय.बी.पी.एस. संस्थेमार्फत अनुज्ञापन निरीक्षक ) या पदासाठी घेण्यात येणा-या परीक्षेकरीता प्रसारीत केलेल्या परिपत्रकाच्या अनुषंगाने खाते प्रमुख/सहायक आयुक्त यांना असे कळविण्यात येते की, उपरोक्त परीक्षेस बसणा-या कर्मचा-यांसाठी दि. म्युनिसिपल युनियन यांनी धुरु हॉल, छबिलदास शाळेसमोर, दादर (पश्चिम), मुंबई 400028 येथे आयोजित केलेल्या मार्गदर्शन वर्गास उपस्थित राहण्यासाठी दि.22 मे 2024 ते दि.31.05.2024 **या कालावधीत दररोज सायं. 4.30 वाजता** कार्यालय सोडण्याची सवलत देण्याबाबतची विनंती उप आयुक्त (विशेष), सह आयुक्त (सा.प्र.) व अति.आयुक्त (शहर) यांनी मान्य केली आहे.

2. खाते प्रमुख/सहायक आयुक्त यांना असे कळविण्यात येते की, वरील परीक्षेसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज केलेल्या व ज्यांचे अर्ज संकेतस्थळावर स्विकारण्यात आले आहेत, फक्त त्या कर्मचा-यांना सायंकाळी 4.30 वाजता कार्यालय सोडण्याची अनुमती देण्यात येत आहे.

३. सदर मार्गदर्शन वर्गास वरील अनुक्रमांक 2 पैकी हजर राहू इच्छिणा-या कर्मचा-यांनी त्यांना दिलेले काम कार्यालय सोडण्यापूर्वी व्यवस्थितपणे पूर्ण केले पाहिजे. कार्यालयीन कामात विलंब अथवा दिरंगाई होणार नाही याची कर्मचा-यांनी खबरदारी घ्यावी. तसेच या प्रशिक्षण वर्गाची उपस्थिती संबंधित वरिष्ठ अधिका-यांना सादर करावी. या सवलतीचा जर कोणी गैरफायदा घेत असल्याचे निदर्शनास आले तर, खाते प्रमुख/ सहायक आयुक्त यांनी संबंधित कर्मचा-यांवर योग्य ती कारवाई करावी.

**४.जे कर्मचारी मार्गदर्शन वर्गास उपस्थित राहण्यासाठी कार्यालय लवकर सोडण्याच्या सवलतीचा फायदा घेतील आणि प्रत्यक्ष परीक्षेस बसणार नाहीत, असे कर्मचारी कारवाईस पात्र ठरतील. खाते प्रमुखांनी अशा कर्मचा-यांवर योग्य ती कारवाई करावी.**

सही/-दि.17.05.2024

**(अनिल काटे)**

**अनुज्ञापन अधीक्षक(प्र)**

**अनुज्ञापन खाते**

**क्र.अअ/2563 , दि. 17.05.2024**

प्रत -----------------------------------------------------------------------------------------------(-------जादा प्रतींसह) यांना माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी कृपया अग्रेषित.

सदर परिपत्रक महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

17/5/2024

प्रशासकीय अधिकारी (अनुज्ञापन खाते)